महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण

जनसंपर्क विभाग

कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.

दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com


म्हाडा MHADA

==============================================================

जावक क्रमांक – ७५४/५३ दिनांक :- २२ एप्रिल, २०२५

प्रसिद्धिपत्रक

# 'म्हाडा'तील १०० दिवस कृती आराखडा अंमलबजावणीचा 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी घेतला आढावा

मुंबई, २२ एप्रिल २०२५ :- नागरिकांचे दैनंदिन जीवन सुखकर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या प्रशासनिक विभागांकरिता मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशानुसार व राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी केलेल्या सूचनेनुसार १०० दिवसांचा कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. या आराखड्याच्या अंमलबजावणीचा 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल(भा.प्र.से.) यांनी म्हाडा मुख्यालयात आज आढावा घेतला.

या आढावा बैठकीत म्हाडाच्या सर्व विभागप्रमुखांनी आपापल्या विभागातील प्रगती अहवाल सादर केला. याप्रसंगी श्री. जयस्वाल यांनी सांगितले की, म्हाडा ही लोकाभिमुख संस्था आहे आणि नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन कार्य करणे हीच संस्थेची खरी जबाबदारी आहे. नागरिकांना कार्यालयात येताना कोणतीही अडचण येऊ नये आणि त्यांना त्यांच्या कामांसाठी सोयीस्कर, सुलभ सेवा मिळावी, यासाठी प्रत्येक अधिकारी आणि कर्मचारी कटिबद्ध आहे.

या बैठकीत म्हाडा मुख्यालयात उभारण्यात येत असलेल्या नागरिक सुविधा केंद्राच्या उभारणीचा तसेच व्हिजिटर मॅनेजमेंट सिस्टिम, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI),क्लाउड मायग्रेशन आणि भौगोलिक माहिती प्रणाली (GIS)या नवकल्पनांच्या अंमलबजावणीबाबत देखील आढावा घेण्यात आला. या सुविधा लवकरात लवकर नागरिकांच्या सेवेत आणाव्यात, असे निर्देश श्री. जयस्वाल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. यावेळी म्हाडाच्या संकेतस्थळाचा उपयोग अधिक सुलभ आणि संवादक्षम होण्यासाठी सुरु असलेल्या कामाचे सादरीकरण करण्यात आले. Chatbot प्रणालीच्या साहाय्याने नागरिकांना म्हाडासंबंधित माहिती सहज उपलब्ध होणार असल्याने श्री. जयस्वाल यांनी याबाबत समाधान व्यक्त केले.

लोकशाही दिनाच्या अनुषंगाने नागरिकांनी दाखल केलेल्या तक्रारींवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यापैकी बहुतांश प्रकरणांवर कार्यवाही झाली असून फक्त सहा प्रकरणे प्रलंबित राहिल्याचे लक्षात आले. ही प्रकरणेही तातडीने निकाली काढावीत, असे निर्देश श्री. जयस्वाल यांनी दिले. भाडेपट्टा करार नूतनीकरणासाठी विकसित केलेल्या नवी MIS प्रणालीचा आढावा घेण्यात आला तसेच मास्टर लिस्ट वाटप प्रक्रियेची माहिती सादर करण्यात आली. मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत कलम ७९अ/ब आणि ९१अ अंतर्गत सुरु असलेल्या कामकाजाची तपशीलवार माहिती देण्यात आली. दादर, माहीम व प्रभादेवी या परिसरांतील भू-संपादन प्रगतीचाही आढावा घेण्यात आला.

याशिवाय, पोलीस वसाहतींचे गृहनिर्माण प्रकल्प तसेच अभ्युदयनगर, गांधीनगर, आराम नगर, पत्रा चाळ आणि बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. वांद्रे रिक्लमेशन,

आदर्शनगर-वरळी वसाहतींच्या पुनर्विकासासाठी राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने निविदा तयार करण्याची पुढील कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश श्री. जयस्वाल यांनी दिले.

या बैठकीत इतर विविध प्रशासनिक व अंमलबजावणीसंबंधी बाबींवरही चर्चा झाली. म्हाडाच्या गृहनिर्माण व पुनर्विकास प्रकल्पांची अंमलबजावणी अधिक कार्यक्षम आणि जलदगतीने करता येईल, असा विश्वास व्यक्त श्री. जयस्वाल यांनी व्यक्त केला.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण



------------------------------------------------------------------------------------------------------------------------

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

D:\Documents\Press Release\53-2025 100 days review meeting by VP Sir.docx

**Maharashtra Housing & Area Development Authority**

Public Relations Department

Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

==========================================================================

Outward No. : 754/53 Dt. April 22, 2025

**Press Release**

# Vice President and CEO Mr. Sanjeev Jaiswal, IAS, reviews MHADA's 100-Day Action Plan with focus on project implementation and service delivery

MHADA CEO directs departments on timely completion of redevelopment, grievance redressal, and infrastructure projects

Mumbai, April 22, 2025: Mr. Sanjeev Jaiswal, IAS, Vice President and Chief Executive Officer of MHADA, reviewed the progress of the 100-Day Action Plan action today at MHADA Headquarters and issued directions for the timely completion of departmental work.

During the meeting, Mr. Jaiswal instructed that citizens must be able to avail services at MHADA offices promptly, conveniently, and with full transparency. He emphasised that all officers must remain committed to removing procedural delays and ensuring efficient service delivery. Each department head presented a report on the progress of activities under their charge.

The review also included updates on the development of a Citizen Facilitation Centre at MHADA Headquarters, along with systems for managing visitor access and improving internal operations. Digital initiatives such as enhanced administrative tools and planning support systems were also reviewed. Mr. Jaiswal directed that these new facilities be completed and made available to the public at the earliest.

A demonstration was given on the ongoing enhancements to MHADA’s official website. The integration of a Chatbot system, designed to provide citizens with access to information and assistance at any time, was reviewed. Mr. Jaiswal noted that these improvements will further simplify public access to MHADA’s services.

Progress on grievance redressal was also reviewed, with a particular focus on complaints received during Lokshahi Din. While the majority of cases have been resolved, six matters remain pending. Mr. Jaiswal instructed that these be addressed without delay.

Further updates were presented on the Master List distribution and the new MIS system developed for lease agreement renewals. The Mumbai Building Repairs and Reconstruction Board reported on the status of work under Sections 91A and 79A/B. Land acquisition progress in the areas of Dadar, Mahim, and Prabhadevi was also reviewed.

Redevelopment projects in Abhyudayanagar, Gandhinagar, Aaram Nagar, Patra Chawl, and BDD Chawls, as well as housing projects for police colonies, were discussed. Mr. Jaiswal directed that tender processes be initiated for the redevelopment of Bandra Reclamation, Adarsh Nagar, and Worli colonies, in line with decisions taken by the State Cabinet.

The review was conducted in line with the broader objectives laid down by Hon’ble Chief Minister Mr. Devendra Fadnavis and Hon’ble Deputy Chief Minister and Housing Minister

Mr. Eknath Shinde, aimed at ensuring timely execution of public services and improving the efficiency of government departments across the state.

The meeting concluded with discussions on various administrative and implementation matters. Mr. Jaiswal expressed confidence that MHADA will be able to deliver improved housing services and expedite project implementation through the ongoing initiatives under the 100-Day Action Plan.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA